नगरसचिव

**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**पुणे महानगरपालिका - सूचना - कार्यपत्रिका क्र. १**

**एप्रिल २०१९**

**पुणे महानगरपालिकेची मासिक सर्वसाधारण सभा गुरूवार दिनांक ४ एप्रिल २०१९ रोजी दुपारी ३:००(तीन) वाजता हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (पुणे महानगरपालिकेच्या नविन विस्तारीत इमारतीतील सभागृहात) भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**'' नेमणूका ''**

**विषय क्र.१**

स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या एका जागेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१(अ) नुसार मनपातील पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देऊन शिवसेना पक्ष यांची स्थायी समिती सदस्यपदाची रिकामी एक जागा नामनिर्देशित करून मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे जा.क्र.७९३६ यांचे दि.१५/३/२०१९ चे पत्र.

**विषय क्र.२**

संदर्भ - १) मनपा ठराव क्र.४७६,दि.२१/१/२००९
२) मा.आबा बागुल यांचे दि. ७/१२/२०१८ चे पत्र
३) मा.स्थायी समिती ठराव क्र. १८२१ दि. १७/१२/२०१८
४) मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/मुले/१४०२ दि.१८/२/२०१९ ने पाठविलेला अभिप्राय.
५) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५८६,दि.२१/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन -

पुणे महानगरपालिका अधिकारी/सेवकांच्या वेतनश्रेण्या दि.१/१/२०१६ पासून सुधारित करणे व तदनुषंगिक मागण्यांच्या संदर्भात म.न.पा. प्रशासन, कामगार संघटनांचे प्रतिनिधी यांचेबरोबर चर्चा करुन विहीत मुदतीत अहवाल सादर करणेसाठी एक नैमित्तिक समिती गठित करून देण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**प्रश्नोत्तरे**

महाराष्ट्र म.न.पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

**- स्थायी समितीचे ठराव -**

**विषय क्र.३**

संदर्भ - १.मा. मुख्यसभा विषय क्र.६६८ ठ.क्र.६४० दि.२६/९/२०१६-
२.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन क्र.एसएफएस-१०१७/प्रक्र.६८५/एसएम-२ मुंबई ३२ दि.२/११/२०१७
३.आमचे कार्यालयाकडील जा.क्र.इओ/उपअधि/९९४ दि.२६/०२/२०१८ च्या पत्रावरील पृष्ठांकन मा.महापालिका आयुक्त पुणे महानगरपालिका यांनी दि.०५/३/२०१८
४.संचालक आय टीच संस्था यांचे दि.३/४/२०१७ चे पत्र
५.श्री शैल मल्लिकार्जुन एज्यु.ट्रस्ट यांचे दि.९/२/२०१८ चे पत्र
६.संचालक आकांक्षा संस्था यांचे दि.२५/१०/२०१६ चे पत्र
७.अध्यक्ष ज्ञानसागर एज्यु सोसा यांचे दि.१७/११/२०१६ चे पत्र
८.मा.मुख्यसभा विषय क्र.१९४ ठ.क्र.२२० दि.२९/८/२०१८
९.मा.मुख्यसभा विषय क्र.३८/२६ ठ.क्र.३६० दि.२९/८/२०१८
१०. मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/इओ/१४३४ दि. २२/२/२०१९ चे पत्र.
११. मा.स्थायी समिती ठराव क्र.२६७२,दि.२७/२/२०१९

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने स्वयंअर्थसहाय्यित योजनेअंतर्गत १८ माध्यमिक शाळा चालविणाऱ्या ज्या संस्था सर्व मुलांना मोफत शिक्षण देणार आहेत अश्या संस्थांचे अनामत रूपये १० लाख माफ करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.११८९, दि.७/३/२०१९ चा झाला आहे.)**

**<u>विषय क्र.४</u>**

संदर्भ – १) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचेकडील जा.क्र. पीएससीडीसीएल/प्रा.वि./९७३/ २०१८-१९, दि.११/१२/२०१८ चे पत्र. आ.क्र. एल/३४८८ दि.१२/१२/२०१८

२) मा.सुनील कांबळे व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि.१७/१२/२०१८ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र. १८४५ दि.१७/१२/२०१८

४) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९२६ दि.१७/१२/२०१८

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आकाशचिन्ह/९३२ दि.३१/१२/२०१८ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९८८ दि.२/१/२०१९

७) मा.स्थायी समिती ठराव क्र. २४०९ दि.५/२/२०१९

८) मा.मारुती तुपे व मा.राजाभाऊ बराटे यांचे दि.१४/२/२०१९ ची उपसूचना

९) मा.स्थायी समिती ठराव क्र. २४८० दि.१४/२/२०१९

१०) मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि. २०/२/२०१९ चे फेरविचाराचे पत्र.

११) मा.स्थायी समिती ठराव क्र.२६१८,दि.२१/२/२०१९

----

मा.स्थायी समिती ठराव क्र. २४८० दि.१४/२/२०१९ चा फेरविचार करण्यात आला.–

मा.महा.आयुक्त यांचे संदर्भांकित क्र. ५ चे विषयपत्र अवलोकन केले तसेच स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

मा.स्थायी समिती दि. ५/२/२०१९ विषय क्र. २४०६ (विषय क्र. २४७७ दि.१२/२/२०१९) मा.महा.आयुक्त यांनी दिलेल्या फेरविचाराच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेने स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांचे समवेत समन्वय करुन संयुक्त निविदा प्रक्रिया राबविण्यास तसेच सदर निविदा प्रक्रिया पूर्ण केल्यावर मा.स्थायी समितीकडे सदर प्रस्ताव दाखल करुन मान्यता घेण्यास व पुढील कार्यवाही पुणे महानगरपालिका व पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. यांनी संयुक्तरित्या करण्यास तसेच मा.मुख्य सभा ठराव क्र. ९२६ दि.१७/१२/२०१८ चा निरस्त करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र.१८४५दि.१७/१२/२०१८चा निरस्त करण्यात येत आहे.

'मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी'

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २४८० दि.१४/२/२०१९ चा दुरुस्त करण्यात येत आहे.

**<u>विषय क्र.५</u>**

संदर्भ – १) क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे पत्र.

२) क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे दि.२९/१२/२०१८ रोजीचे पत्र.

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/औंध-बाणेर/१४३६,दि.२२/२/२०१९चे पत्र.

४) मा.स्थायी समिती ठराव क्र. २६७९ दि. २७/२/२०१९

५) मा.प्रकाश ढोरे व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.८/३/२०१९ चे फेरविचाराचे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८७७, दि.८/३/२०१९

----

मा.स्थायी समिती ठराव क्र. २६७९ दि. २७/२/२०१९ चा फेरविचार करण्यात आला.

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

खेलो इंडिया युथ गेम्स २०१९ अंतर्गत शिवछत्रपती क्रीडा संकुल,म्हाळुंगे-बालेवाडी,पुणे येथे स्वच्छतेसाठी मनुष्यबळ व साधनसामुग्री पुरविणे या करण्यात आलेल्या कामांसाठी व त्याप्रमाणे खर्च करणेस MMC Act १९४९ चे कलम ८९ नुसार पश्चात मान्यता द्यावी अशी मा.स्थायी समिती ठराव क्र. २६७९ दि. २७/२/२०१९ अन्वये मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात आली होती परंतु लोकसभा निवडणूक आचारसंहिता व सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाची समाप्ती लक्षात घेता वरील ठरावाचा फेरविचार करून सदर ठिकाणी यापूर्वीच काम झालेले असल्याने संबंधितांस देयके अदा करणे क्रमप्राप्त आहे.

त्यामुळे मा.स्थायी समिती ठ.क्र.२६७९ दि.२७.०२.२०१९ चा फेरविचार करून ठरावामध्ये खालील प्रमाणे बाब समाविष्ट करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

"संबंधित कामाची वर्क ऑर्डर व देयके देण्यासंबंधीचे अधिकार मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महापालिका आयुक्त यांना देण्यात येत आहेत"

याबाबत यापुर्वी झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २६७९ दि. २७/२/२०१९ चा दुरुस्त करण्यात येत आहे.

(टीप :- याबाबत मूळ विषय माहे मार्च २०१९ कार्यपत्रिकेवर विषय क्र.१२११ हा प्रलंबित आहे.)

**विषय क्र.६**

संदर्भ - १) मा.सचिन दोडके व मा.राजेंद्र शिळीमकर यांचे दि.८/३/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८७८,दि.८/३/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र.३२ड, रस्ते विभागामार्फत विविध विकासाची कामे करणेसाठी र.रु.४० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक,<br>प्रभाग क्र.३२ ड मधील ज्ञानेश्वरी उद्यान जवळ नव्याने होणाऱ्या क्रीडांगण परीसरामध्ये फ्लॅग कोड ऑफ इंडिया मार्गदर्शक तत्वाचा राष्ट्रध्वज उभा करणे व तदनुषांगिक विद्युत विषयक उर्वरित कामे करणे. | ४० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम-<br>**प्रभाग क्र.३२ ड रस्ते विभागामार्फत विविध विकासाची कामे करणे** | --- | ४० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.७**

संदर्भ - १) मा.दिलिप वेडेपाटील व मा.दिपक पोटे यांचे दि.८/३/२०१९ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८७९,दि.८/३/२०१९

----

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन -

प्रभाग क्र. २८ ब मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रु.१ कोटी २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०६, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५), पान क्र. २२७, अ.क्र. ४४८, (CE20C352/SB5-1648) शहरातील नदीवरील पुलांवर नवीन प्रकाश व्यवस्था व सुशोभिकरण करणे. | १ कोटी २० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे- | | |
| १) प्रभाग क्र.२८ब मध्ये मुख्य चौकातील उड्डाणपुलासाठी अद्ययावत LEDनामफलक तयार करणे व बसविणे | --- | १० लक्ष |
| २) प्रभाग क्र.२८ब मध्ये विविध ठिकाणी सी.सी.टी.व्ही.बसविणे | --- | २० लक्ष |
| ३)प्रभाग क्र.२८ब मध्ये म.न.पा .शाळेमध्ये व इमारतीमध्ये अद्ययावत LEDनामफलक तयार करणे व बसविणे | --- | १० लक्ष |
| ४) प्रभाग क्र.२८ब मध्ये पूनावाला उद्यान समोरील रस्त्यावर पोल उभारून प्रकाश व्यवस्था करणे | --- | १० लक्ष |
| ५) प्रभाग क्र.२८ब मध्ये मंदिराजवळ दीपस्तंभ उभारून प्रकाश व्यवस्थेची कामे करणे | --- | १० लक्ष |
| ६) प्रभाग क्र.२८ब मध्ये बिबवेवाडी कोंढवा रोड हाईड पार्क रस्त्यावर डेकोरेटीव्ह पोल उभारणे | --- | १० लक्ष |
| ७) प्रभाग क्र.२८ब मध्ये राजलक्ष्मी सोसायटी ते वास्तुश्री कॉम्प्लेक्स मुख्य रस्त्यावर डेकोरेटीव्ह पोल उभारणे | --- | १० लक्ष |
| ८) प्रभाग क्र.२८ब मध्ये विविध ठिकाणी दीपस्थंभ डेकोरेटीव्ह पोल उभारणे | --- | १० लक्ष |
| ९) प्रभाग क्र.२८ब मध्ये इरावती कर्वे मार्गावरील आतमधील गल्ल्यांमध्ये डेकोरेटीव्ह पोल उभारून प्रकाश व्यवस्था करणे | --- | १० लक्ष |

१०) प्रभाग क्र.२८ब मध्ये सॅलीसबरी पार्क भागातील रस्त्यावर डेकोरेटीव्ह पोल उभारणे --- १० लक्ष

११) प्रभाग क्र.२८ब मध्ये शंकरराव लहाने पथ ,पी.एन.टी.कॉलनी ,गुलटेकडी परिसरात डेकोरेटीव्ह पोल उभारणे --- १० लक्ष

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र.८**

संदर्भ - १) मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(ई)यांचे जा.क्र.मआ/सा.प्र/११९८ दि.२३/०१/२०१९ चे पत्र.
२) विधी समिती ठ.क्र २९, दिनांक २४/१/१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८८०,दि.८/३/२०१९

विषय:- सन २०१८ -१९ या अंदाजपत्रकामध्ये विविध सार्वजनिक संस्थांचे नावे मान्य झालेल्या देणगीची रक्कम अदा करणेबाबत

----

मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारत घेऊन-

सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकामध्ये ज्या सार्वजनिक संस्थांना देणगी मान्य केली अशा संस्थाकडून विहित नमुन्यामध्ये करारनामा लिहून दिल्यानंतर, तसेच खालील बाबींची पूर्तता केल्यानंतर रक्कम आदा करण्यास मान्यता दयावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१)संबंधित संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई) यांच्या पत्रा सोबतच्या परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे पुणे मनपाचे दोन प्रतिनिधी अथवा अधिकारी यांची नेमणूक करणेस.

२)सदर संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावर ,संस्था ज्या वार्डमध्ये येत असेल त्या वार्डचे विद्यमान सभासद नेमणेस.

३) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई) यांच्या पत्रा सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अंदाज पत्रकामध्ये या संस्थेच्या नावामध्ये चूक/बदल झाला असल्यास ,त्यांच्या नाव व पत्ता दुरुस्ती/बदल करण्यास

**विषय क्र.९**

संदर्भ - १) मा.अति.महा.आयुक्त वि यांचे जा.क्र.मआ/मंडई/११९२ दि.२२/१/२०१९ चे पत्र.
२) शहर सुधारणा समिती ठ.क्र ४२३, दि.१/३/१९
३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८८१,दि.८/३/२०१९

विषय:- पुणे महानगरपालिकेच्या महात्मा फुले मंडई अंतर्गत लोहगांव आठवडे बाजार येथील साप्ताहिक व दैनंदिन पास फी वसूली मक्त्याबाबत

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-

पुणे महानगरपालिकेच्या महात्मा फुले मंडई अंतर्गत लोहगाव आठवडे बाजार येथील साप्ताहिक व दैनंदिन पास फी वसूली मक्त्याबाबत चालविणेस देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या ५ निविदांपैकी निखील एन्टरप्रायझेस यांनी देऊ केलेली सन २०१८-१९साठी वार्षिक रक्कम रूपये ३८,५०,०००/- ( अक्षरी रक्कम रू. अडोतीस लाख पन्नास हजार फक्त) हि रक्कम संदीप विष्णू खांदवे,सायन व्हिजीलेंट सर्व्हिसेस, अंबिका कन्स्ट्रक्शन पुणे यांच्या रकमेपेक्षा जास्त आहे .तसेच मनपा निर्धारीत रक्कम रूपये १८,५०,४६४/-( अक्षरी रक्कम रू.अठरा लाख पन्नास हजार चारशे चौसष्ठ फक्त) पेक्षा निविदादाराने देऊ केलेली रक्कम कितीतरी अधिक असल्याने यात मनपाचे नुकसान होत नाही.

तुलनात्मक तक्ता

| अ.क्र. | निविदादाराचे नाव | सन | एकूण रक्कम रूपये |
|---|---|---|---|
| १ | निखील एन्टरप्रायझेस | २०१८-१९ | ३८,५०,०००/- |
| २ | संदीप विष्णू खांदवे | २०१८-१९ | ३६,००,१०१/- |
| ३ | सायन व्हिजीलेंट सर्व्हिसेस | २०१८-१९ | ३३,३३,३३३/- |
| ४ | अंबिका कन्स्ट्रक्शन | २०१८-१९ | ३२,११,०००/- |

तरी वरील नमूद केलेल्या अ.क्र.१ नुसार सर्वाधिक कमाल रक्कम रूपये ३८,५०,०००/- ( अक्षरी रक्कम रू.अडोतीस लाख पन्नास हजार फक्त)यांना कार्यारंभ आदेशाच्या दिनांकापासून पुढील एक वर्ष कालावधीसाठी लोहगाव आठवडे बाजार साप्ताहिक व दैनंदिन पास फि वसुलीचा मक्ता देणेस व त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१०**

संदर्भ – १) मा.सौ. वैशाली मराठे यांचे दि. २७/२/२०१९ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठ.क्र ४३०, दिनांक १/३/२०१९

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८८२,दि.८/३/२०१९

––––

शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेऊन–

संस्कार सेवाभावी संस्था, गोंधळेनगर, पुणे ही एक रजिस्टर्ड संस्था असून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात काम करण्यात सदर संस्थेचा मोलाचा वाटा आहे. या संस्थेला त्यांच्या समाजपयोगी कामासाठी व विविध उपक्रमांसाठी स्वतःची जागा उपलब्ध नाही. त्यामूळे संस्थेला स्वतःचे कार्य करताना अनेक अडचणी येतात.

जयभवानीनगर, पौड रोड या ठिकाणी पुणे महानगरपालिकेची स्वतःचे मालकीची पहिल्या मजल्यावरील अंदाजे ४०० चौ. फूट इतकी जागा विनावापर पडून आहे. तिचा वापर झाल्यास परिसरातील गोरगरीब नागरिकांना त्याचा फायदा होणार आहे.

तरी सदरची जागा संस्कार सेवाभावी संस्था, गोंधळेनगर, पुणे या संस्थेला पुणे मनपाच्या अटी व शर्तीनुसार ५ वर्षासाठी व नाममात्र भाड्याने देण्यास मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.११**

संदर्भ – १) मा.हरिदास चरवड,मा. दिलिप वेडेपाटील,मा. हेमंत रासने, मा.योगेश समेळ,मा. महेंद्र पठारे, मा.दिपक पोटे, मा. प्रकाश ढोरे यांचे दिनांक ८/३/२०१९ चे पत्र

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२८८३,दि.८/३/२०१९

––––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावांमधील प्रॉपर्टी टॅक्स (मिळकत कर) पुणे मनपाच्या नियमाप्रमाणे कार्पेट एरियाप्रमाणे लावण्यात यावा. ग्रामपंचायतीमध्ये सदर मिळकतीचा प्रॉपर्टी टॅक्स हा बिल्टअप एरियावर लावण्यात आलेला आहे. सदर मिळकतधारक हजारोंच्या संख्येने आहेत. मिळकतधारक पुणे मनपा नियमानुसार प्रत्यक्ष मोजून कार्पेट एरियाप्रमाणे त्वरीत भरण्यास तयार आहे. सदर मिळकत कर नविन नियमाप्रमाणे केल्यास पुणे मनपाच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल व त्या गांवामध्ये वेगाने विकास करता येईल. तरी सदर प्रस्तावास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**मा.शहर सुधारणा समितीचे ठराव**

**विषय क्र.१२**

संदर्भ – १) मा.सुशिल मेंगडे, अध्यक्ष–शहर सुधारणा समिती यांचे दि. १/३/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४२६,दि.१/३/२०१९

––––

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे पेठ धायरी स.नं.१३०/८ या ठिकाणी जाण्या येण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने ३० मी.डी.पी. रस्ता लागून स.नं.१३०/४ या मिळकतीमधून १२ मी.रूंदीचा पूर्व–पश्चिम कलम २०५ अन्वये रस्ता आखण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**विषय क्र.१३**

संदर्भ – १) मा.सौ.राणी भोसले व मा.सौ.ज्योती गोसावी यांचे दि. १/३/२०१९ चे पत्र.

२) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.४२७,दि.१/३/२०१९

––––

शहर सुधारणा समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे पेठ भवानी सि.स.नं.४९/अ,मे.शासन राजपत्रानुसार निवासी विभागात समाविष्ट आहे. भवानी सि.स.नं.४९/अ/१ व भवानी सि.स.नं.४९/अ/२ असे दोन भागामध्ये विभागणी मिळकत पत्रिकेनुसार आहे. सुधारित विकास योजना आराखडयानुसार सि.स.नं.४९/अ/२ ही मिळकत निवासी विभागात समाविष्ट असून सि.स.नं.४९/अ/१ ही मिळकत CPG-1 करीता आरक्षित दर्शविलेली आहे. तरी संपूर्ण सि.स.नं.४९/अ/१ ही मिळकत निवासी विभागामध्ये समाविष्ट करण्यात यावी. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियमानुसार पुढील कार्यवाही करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## मा.महिला व बाल कल्याण समितीचा ठराव

**विषय क्र.१४**

संदर्भ – १) मा.राजेश बराटे व मा.मारूती ( आबा ) तुपे यांचे दि.२७/२/२०१९

२) मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र.१५१,दि.२७/२/२०१९

----

मा.महिला व बाल कल्याण समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

प्रभाग क्र.३१ कर्वेनगर येथील मनपा शाळा क्र.१३३ सम्राट अशोक विद्यालय याठिकाणी इ.८ वी.चे वर्ग सुरू करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## मा.महापालिका आयुक्तांचे पत्र

**विषय क्र.१५**

संदर्भ – १) मा.दिलिप बराटे व मा.योगेश समेळ यांचे दि.४/७/२०१७ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.२७१,दि.४/७/२०१७

३) मा.संजय भोसले व मा.कर्णेगुरूजी यांची दि. २१/७/२०१७ ची उपसूचना.

४) मा.महानगरपालिका सभा ठराव क्र.१६७,दि.२१/७/२०१७

५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/माव्य/६९३०, दि.१०/१२/२०१८ चे पत्र.

----

मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

१) संदर्भांकित क्र.४ ठराव झालेवेळी पुणे पेठ शिवाजीनगर अ.भू.क्र. ४०३/अ/१, न.भू.क्र. ९८५ सेनापती बापट रोड येथील आय.सी.सी. पॅव्हेलियन मधील तिसऱ्या व चौथ्या मजल्यावरील एकूण बांधीव ऑफीसचे क्षेत्रफळ ३०३१.७५ चौ.मी. पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेची कार्यवाही सुरू आहे.

२) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. पुणे महानगरपालिकेची एक संस्था आहे. सदर संस्थेबरोबर चांगल्या प्रकारे समन्वयासाठी पुणे महानगरपालिका भवनात पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. पुणे चे कार्यालय असणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिका भवनातील तिसऱ्या मजल्यावरील नगर सचिव कार्यालयाची जागा मनपा भवनाचे आवारात बांधलेल्या नवीन इमारतीत स्थलांतर करावयाचे आहे. नगर सचिव कार्यालयाचे स्थलांतर झाल्यानंतर नगर सचिव कार्यालयापैकी जागा स्मार्ट सिटीचे कार्यालयासाठी उपलब्ध करता येईल.

तसेच पुणे पेठ शिवाजीनगर स्वा. वीर सावरकर उद्योग भवनामधील ३ रा मजला अंदाजे ९५०० चौ.फुट व मुख्य इमारतीमधील ३ रा मजल्यावरील ४५०० चौ.फुट व पुणे पेठ औंध मधील मंथन इमारतीमधील ३०९९ चौ. फुट जागा स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. पुणे यांना देणेचे प्रस्तावित केले आहे. त्यामुळे पुणे पेठ शिवाजीनगर सेनापती बापट रोड येथील आय.सी.सी. सेंटर मधील जागा देणेचे प्रयोजन राहत नाही.

३) पुणे पेठ शिवाजीनगर अ.भू.क्र. ४०३/अ/१, न.भू.क्र. ९८५ सेनापती बापट रोड येथील आय.सी.सी. पॅव्हेलियन मधील सन २०१८–१९ च्या शिघ्रसिद्धगणकानुसार दरमहाचे भाडे रक्कम रू. ४४,१२,४०९/– इतके होत आहे. सदर जागा निविदा प्रक्रिया राबवून भाडे कराराने दिल्यास किमान वार्षिक भाडे (मुल्यांकनाप्रमाणे) रू. ५,२९,४८,९०८/– इतके उत्पन्न पुणे मनपास मिळेल.

वरील बाबींचा विचार करता पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. पुणे यांना सदर ऑफीसची जागा देणेबाबत संदर्भांकित ठरावाचा फेरविचार करून व आय.सी.सी. पॅव्हेलियन मधील तिसऱ्या व चौथ्या मजल्यावरील एकूण क्षेत्र ३०३१.७५ चौ.मी. चा पुणे महानगरपालिकेच्या ताब्यात आल्यानंतर मिळकत वाटप नियमावली २००८ प्रमाणे भाडे कराराने देणेचा विनियोग करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

याबाबत यापुर्वी झालेला मा.मनपा सभा ठराव क्र. १६७ दि. २१/७/२०१७ चा निरस्त करण्यात येत आहे.

**(टिप – सदर विषयाचा विचार माहे एप्रिल २०१९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.११८३, दि.१/३/२०१९ चा झाला आहे.)**

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र.१६**

संदर्भ– मा.दिलीप वेडेपाटील यांची दि.८.३.२०१९ ची सूचना.

१) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९८४,दि. २९/०१/२०१८

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९९८,दि. ०९/०२/२०१८

३) मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र.मआ/माव्य/७९० दि.०७.१२.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३२१, दि.१४/१२/२०१८

विषय– कोथरूड – बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत असणा–या पौड कचरा रॅम्पची जागा मेट्रोसाठी दिल्यामुळे रॅम्प करीता पर्यायी जागा उपलब्ध होणेबाबत.

----

मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून

कोथरूड कचरा डेपो येथे सुमारे २५ वर्ष पासून कचरा हस्तांतरन केंद्र (Ramp) द्वारे कच–याचे दळणवळण सुरू आहे. या भागात कोथरूड व वारजे क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत येणा–या कार्यक्षेत्रात निर्माण होणा–या सुमारे २५०–३०० मे. टन कचरा १०० वाहन मार्फत संकलीत केला जात असून या कच–याची वाहतूक कचरा हस्तांतरन केंद्रा मार्फत पुणे महानगरपालिकेच्या विविध कचरा प्रकल्पावर तसेच landfill site वर केली जाते. सदरची वाहनांची पार्किंग व्यवस्था ही या ठिकाणी आहे.

सध्यस्थितीत संदर्भ क्र. २ अन्वये सदर जागा मेट्रो प्रकल्पासाठी देण्यात आली असून याठिकाणी कचरा डेपोच्या जागेवर मेट्रो स्टेशन उभारण्याचे नियोजन आहे. हे स्टेशन कार्यान्वित झाल्यानंतर या ठिकाणी कचरा हस्तांतराचे काम करणे शक्य होणार नाही यामुळे कच–याच्या वाहतूकीस मोठी अडचण निर्माण होणार आहेत. निर्माण होणा–या कच–याची कात्रज हस्तांतरण केंद्रा पर्यंत वाहतूक करावी लागणार आहे. सदर वाहतुकी करीता अतिरिक्त खर्च होणार असून, कोथरूड ते कात्रज अशा खेपा करायच्या झाल्यास त्याकरीता आवशक वेळ वाढणार आहे व सदर वाहनांचा पूर्ण कार्यक्षमतेने वापर होणार नाही तसेच दैनंदिन कचरा उठावावर परिणाम होऊन कोथरुड व वारजे क्षेत्रिय कार्यालयाचा कार्यक्षेत्रात आरोग्य विघातक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असून सबब भागाकरीता रॅम्पची आवश्यकता आहे.

या संदर्भात कोथरूड – बावधन क्षेत्रिय कार्यालयांतर्गत असणा–या पौड कचरा रॅम्प स्थलांतरीत करण्याकरीता पर्यायी जागा मिळणेकरीता प्रस्ताव मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त(विशेष) यांचेकडे सादर केला आहे. सदर प्रस्तावामध्ये बावधन खुर्द स.नं. ६४ येथील जकात नाक्याची जागा सुचविण्यात आली आहे. याबाबत मालमत्ता व्यवस्थापन विभागाचा अभिप्राय घेतला असता संदर्भ क्र. १ मा. मुख्य सभा ठराव क्र. ९८४दि. २९/०१/२०१८ नुसार सदर जागा ३० वर्षे मुदतीसाठी परिवहन महामंडळास देण्यात आली असून दि. १६/०४/२०१८ रोजी ताबापावतीने परिवहन महामंडळास देण्यात आली आहे. याबाबतीत पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे ७८०० चौ.मी. जागेपैकी ४००० चौ.मी(सुमारे १ एकर) जागा देणेबाबत विनंती करण्यात आली होती. याबाबत सदर जागा कचरा हस्तांतरण केंद्रासाठी देणे शक्य होणार नाही असे त्यांनी कळविले आहे.

परंतु सदर सुचविलेली जागा कचरा हस्तांतरन केंद्रासाठी योग्य असून या जागेवर रॅम्प उभारल्यास कोथरूड व वारजे क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणा–या कार्यक्षेत्रात निर्माण होणा–या कच–याच्या वाहतुकीच्या समस्यावर कायमस्वरूपी तोडगा निघणे शक्य होणार आहे.

सद्यस्थितीत सदर जागेपैकी अंशत: जागेचा वापर परिवहन महामंडळामार्फत करण्यात येत असून उर्वरित वापरात नसल्याचे दिसून येते. सदर बाबतीस मुख्य सभा ठराव क्र. ९८४,दि. २९/०१/२०१८ मुद्दा क्र. १ नुसार महानगरपालिकेस आवश्यकता असेल त्या वेळेस सदर जागा पुणे महानगर परिवहन महामंडळ प्रशासनास सदर जागा पुणे महानगरपालिकेस परत करावी लागेल असे नमूद केले आहे. त्यानुसार मा. मुख्य सभेची मान्यता घेऊन सदर जागी कचरा हस्तांतरण केंद्र उभारणे शक्य होणार आहे.

तरी वरील गोष्टींचे अवलोकन होवून बाबधन खुर्द स.नं. ६४ येथील ७८०० चौ.मी. जागा महानगर परिवहन महामंडळाकडून परत घेऊन सदर जागा कचरा हस्तांतरन केंद्रासाठी आरक्षित करून मिळावी याकरीता खालील बाबीस मान्यता देण्यात येत आहे.

१.बाबधन खुर्द स.नं. ६४ येथील पुणे महानगर परिवहन महामंडळ यांना मनपाकडून देण्यात आलेली ७८०० चौ.मी. जागा परत घेऊन कचरा हस्तांतरण केंद्रा करीता देणेस.

२.बाबधन खुर्द स.नं. ६४ याठिकाणी कचरा हस्तांतरण केंद्राची उभारणी करणेस.

असा मनपा ठराव क्र.१०६९, दिनांक २१/१/२०१९ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ– १) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९८४,दि. २९/०१/२०१८

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ९९८,दि. ०९/०२/२०१८

३) मा.महापालिका आयुक्त यांनी जा.क्र.मआ/माव्य/७९० दि.०७.१२.२०१८ ने पाठविलेला अभिप्राय

४) मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.३२१, दि.१४/१२/२०१८

-----

बाबधन खुर्द स.नं. ६४ येथील ७८०० चौ.मी. जागा महानगर परिवहन महामंडळाकडून परत घेऊन सदर जागा कचरा हस्तांतरन केंद्रासाठी आरक्षित करून मिळावी. या विषयाला स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध असल्यामुळे मनपा मुख्य सभा ठराव क्र.१०६९ ,दि.२१.१.२०१९ दफ्तरी दाखल करण्यास मान्यता देण्यात यावी.

<u>विषय क्र.१७</u>

संदर्भ – मा.ॲड्.अब्दुल गफूर अहमद पठाण यांची सूचना दि.११/३/२०१९

१) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९९ दि. २५/५/१९९३

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ८६ दि. २४/६/१९९३

३) वि.भू.सं.अ.क्र.१६ यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्र. भूसंपादन करणे/आढावा/जि.सभा/ २०१३- १४/३००६ दि. २/८/२०१३

४) मा.महा.आयुक्त यांचेसमवेत दि. ५/७/२०१६ रोजीची बैठक

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/१७ दि.१५/४/२०१७ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४१, दि.२८/६/२०१७

७) मा. प्रमोद ऊर्फ नाना भानगिरे यांची सूचना दिनांक १६/१/२०१८

८) मनपा ठराव क्र.१६८,दि.१९/७/२०१८

९) मनपा ठराव क्र.९१५,दि.१४/१२/२०१८

----

पुणे, पेठ कोंढवा खुर्द स.नं.४० (एलए-४२४) येथील जकात नाक्यासाठी भूसंपादन प्रस्ताव रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

असा मनपा ठराव क्र.११८०, दिनांक १/३/२०१९ चा ठराव मान्य झाला असून सदर ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ – १) मा.स्थायी समिती ठराव क्र. १९९ दि. २५/५/१९९३

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ८६ दि. २४/६/१९९३

३) वि.भू.सं.अ.क्र.१६ यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्र. भूसंपादन करणे/आढावा/जि.सभा/ २०१३- १४/३००६ दि. २/८/२०१३

४) मा.महा.आयुक्त यांचेसमवेत दि. ५/७/२०१६ रोजीची बैठक

५) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/भूसंपादन/१७ दि.१५/४/२०१७ चे पत्र.

६) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४१, दि.२८/६/२०१७

७) मा. प्रमोद ऊर्फ नाना भानगिरे यांची सूचना दिनांक १६/१/२०१८

८) मनपा ठराव क्र.१६८,दि.१९/७/२०१८

९) मनपा ठराव क्र.९१५,दि.१४/१२/२०१८

---

सदर ठरावात नमूद असलेली जागा आमचे प्रभागातील विकास कामांसाठी आवश्यक आहे. सदर जागेत नागरिकांना सोयी व सुविधा उपलब्ध करून देणेसाठी बहुउद्देशिय इमारत व सांस्कृतिक भवन विकसित करावयाचे आहे. तरी सदर जागेवर नवीन आरक्षण करणेबाबत कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी.

**नगरसचिव कार्यालय,**
**पुणे महानगरपालिका,**
शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दिनांक :-२२/३/२०१९.

**सुनील पारखी**
**नगरसचिव,**
पुणे महानगरपालिका.

**(टीप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**